महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई
<u>यांना शासकीय भाग भांडवल देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९२/टेक्स-२
१६ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ५ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- १) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या, नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक २३१, दि. २७.०५.२०१७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं -२०१७/प्र.क्र.७५/अर्थ -३, दि. १८.०४.२०१७ .
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि. १०.०५.२०१६.

प्रस्तावना :-

राज्यातील सहकार पणन व वस्त्रोद्योग क्षेत्राबाहेरील यंत्रमाग विनकरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची स्थापना केलेली आहे. या महामंडळास त्यांचे उत्पादन कार्य राबवण्यासाठी भाग भांडवल देण्याची राज्य शासनाची योजना आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या, मुंबई या संस्थेला यंत्रमागावर ग्रे कापड तयार करून घेऊन त्यावर प्रक्रिया करणे, विणकरांना सुत पुरवठा करणे, तयार होणाऱ्या कापडाची विक्री करणे इत्यादी कामासाठी भागभांडवल म्हणून रु.१००.०० लक्ष (रुपये शंभर लक्ष फक्त) शासकीय भागभांडवल मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरचा निधी विहित पद्धतीने खर्च करण्यात यावा.

२. या वरील खर्च :-

“मागणी क्रमांक - व्ही-३
४८५१-ग्रामोद्योग व लघुद्योग यावरील भांडवली खर्च
(००) (१९०)- सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका.
(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना,
(००)(०३) महाराष्ट्र राज्य सहकारी यंत्रमाग महामंडळाला भागभांडवली अंशदान
(४८५१००९७)”
३२, अंशदाने

या लेखाशीर्षाखाली २०१७-२०१८ या वर्षाकरिता मंजूर असलेल्या रुपये १००.०० लक्ष इतक्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. उपरोक्त रक्कम “महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई” (MAHARASHTRA STATE POWERLOOMS CORPORATION LTD. MUMBAI) यांना RTGS द्वारे वितरीत करण्यात यावी. बँक खात्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. Syndicate Bank, New Marine Lines Branch, Mumbai, overdraft Account No. 50351210000305. IFSC Code - SYNB0005035, MICR CODE - 400025032.

४. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या रकमेचे आहरण करून संबंधितांना वितरीत करण्याकरिता श्री. र.ग. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. ब.बा. चव्हाण, सहसचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

शासन निर्णयान्वये मंजूर केलेली रक्कम अधिदान व लेखाधिकारी कार्यालय मुंबई, येथून आहारीत करून संबंधितांना वितरीत करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांनी करावी.

५. वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ अन्वये ३२ अंशदाने या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ पैकी ७अ, ११, १२, १३, १४, १६, १७ व १८ या प्रकरणी लागू नाही. परिच्छेद ७ब, ७क, ८, ९ १० व १५, ची या प्रकरणी लागू असलेल्या अटींची तसेच तपासणी सूचीप्रमाणे (परिशिष्टातील अनुक्रमांक ९) सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

६. वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद ब मधील २ नुसार वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र. क्र.७५/अर्थ-३, दिनांक २० एप्रिल, २०१७ च्या परिशिष्टातील अनु.क्र.१, २, ५, ६, ७ व ८ या प्रकरणी लागू नसल्याने व सदर योजना ही Regular राज्य योजनांतर्गत योजना असल्याने अंशदान या सदराखाली शासकीय भागभांडवल असून नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

७. वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद ब मधील ३ नुसार वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र. क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिशिष्टातील अनु.क्र.३ मधील तरतुदी विचारात घेता योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्ती मध्ये बदल होत नसल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

८. वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद ब मधील ३ नुसार वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र. क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिशिष्टातील अनु.क्र.९ संदर्भातील तपासणी सूचीमधील याप्रकरणी लागू असलेल्या मुद्दयांची पुर्तता होत आहे.

९. वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद अ नुसार याप्रकरणी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

अ) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/ प्र. क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ अन्वये ३२ अंशदाने या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

ब) मंजूर निधी :- “मागणी क्रमांक व्ही-३, ४८५१-ग्रामोद्योग व लघु उद्योगावरील भांडवली खर्च, (००)(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना-(००)(०३) महाराष्ट्र राज्य सहकारी यंत्रमाग महामंडळाला भागभांडवली अंशदान (४८५१००९७)” या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु. १००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे.

क) मागील ३ महिन्यापुर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे :-महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई या संस्थेस सन २०१७-२०१८ मध्ये भागभांडवलापोटी मागील ३ महिन्यापूर्वी कोणताही निधी मंजूर करण्यात आलेला नाही.

ड) ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे त्या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- या योजनेखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशिर्षाखाली प्रलंबित नाही.

इ) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

प) वैयक्तिक लाभार्थींचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे :- लागू नाही.

फ) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिका-यांची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- लागू नाही.

भ) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत. :- लागू नाही.

म) खरेदी विषयक प्रक्रीया अद्यावत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक भांखस- २०१४ /प्र. क्र. ८२ /भाग III/ उद्योग, दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेस असावा :- खरेदी विषयक प्रक्रीया अद्यावत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक भांखस- २०१४ /प्र. क्र. ८२ /भाग III/ उद्योग, दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन आदेशानुसार करावी.

१०. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६ /प्र.क्र.२१५/उद्योग-४, दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलच्या कार्यपद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

११. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्रमांक वित्त विभाग क्र. अर्थसं - २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ तसेच वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७१००५१७०४३१९००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Gauri Rahul Mhaske

Digitally signed by Gauri Rahul Mhaske
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=e3b06f24c3c5bb026c414c42f865f39144c21fb0f8c3a69c8e6e8dc2c5bb9ddd,
serialNumber=b018ba858dd6b20cc7a84f6bc86a86d6a6e9ac3ac56c5dbfcd89f36c74de3e1f, cn=Gauri Rahul Mhaske
Date: 2017.10.05 16:53:28 +05'30'

(गौरी.रा.म्हस्के)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.

२) महालेखापाल (लेखापरीक्षका), मुंबई / नागपूर.

३) महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
४) कक्ष अधिकारी (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५) वित्त विभाग, (व्यय-२) अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई.
६) नियोजन विभाग, (योजना -१७) मंत्रालय, मुंबई.
७) अवर सचिव (१७-सी) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., मुंबई.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
१२) सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, मुंबई.
१३) निवड नस्ती (टेक्स-२).